# महाराष्ट्रात सुरू होतेय "बापांची शाळा'

-

Monday, August 06, 2012 AT 02:00 AM (IST)
Tags: parenting, edutcation, mumbai

मुंबई- बापाने कसे असावे, याचे काही ठोकताळे समाजात आहेत. पित्यांना या साच्यातून बाहेर काढून पितृत्वाचा शोध घेण्यासाठी राज्यात आता "बापांची शाळा' सुरू होत आहे. या शाळेतील पहिल्या तुकडीचे प्रवेश "फुल्ल' झाले आहेत.

बाबाची भूमिका कशी असते, ती कशी असायला हवी, यावर चर्चा करण्यासाठी "सम्यक' या संस्थेने राज्याच्या वेगवेगळ्या भागांतील कार्यकर्त्यांची कार्यशाळा घेतली. हा विषय केवळ चर्चेच्या पातळीवर सीमित न ठेवता कुटुंब, समाज, संस्कृती आदी क्षेत्रांतील पुरुष आणि पिता या नात्याचा शोध घेण्याचा प्रयास होणार आहे. मुलांना घडवताना वडील म्हणून भावनिक पातळीवर विचार केला जातो. या नात्याला असणारे अन्य पैलूही महत्त्वाचे असतात. पाल्यांच्या हक्कांबाबत, मुलांना "सोशल' करण्यात, सहसंवेदना जागविण्यात, स्त्रियांच्या अधिकारांचा आदर शिकविण्यात बाबाची भूमिका महत्त्वाची असते. त्याच्या वर्तनातूनच मुले हे शिकत असतात.

मुलांना वाढविण्यात आईची भूमिका कशी असावी, हे वारंवार सांगितले जाते. त्यात वडिलांच्या भूमिकेचा विस्तृत विचार केला जात नाही. तो विचार या कार्यशाळेत केला जाणार असल्याचे या अभिनव प्रकल्पाचे प्रणेते आनंद पवार सांगतात. मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, नाशिक, सातारा अशा अनेक ठिकाणी "बापांची शाळा' सुरू होणार आहे.

मुलगी आणि बाबा यांच्या नात्यातील जिव्हाळा साहित्य आणि चित्रपटातून समोर आला आहे. या शाळेतूनही पिता आणि मुलांच्या नात्यातील असंख्य पदर उलगडले जातील. त्यासाठी अप्रकाशित साहित्याचा आधार घेतला जाईल, विचारांची देवाणघेवाण होईल. "रोल मॉडेल' मानले जाणारे अनेक बाबा या उपक्रमात सहभागी होतील. संस्कारसमृद्ध नवी पिढी घडविण्यासाठी या शाळेत सहभागी होण्याचे आवाहन "सम्यक'ने "बाप' मंडळींना केले आहे.

http://online2.esakal.com/esakal/20120806/4760623824861319274.htm